प्रेस नोट दिनांक ३१/१०/२०२३

**श्री. शैलेश आत्माराम रेवाळे, वय. ३८ वर्षे, आरोग्य सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केन्द्र कोतवडे ता. जि. रत्नागिरी यांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडलेबाबत...**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | रत्नागिरी युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गु.रजि.नं. /२०२३ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. शैलेश आत्माराम रेवाळे, वय. ३८ वर्षे, आरोग्य सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केन्द्र कोतवडे ता. जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाचेची रक्कम | १५,०००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे मालकांची मौजे काळबादेवी येथे बिनशेती जमिन असुन सदर ठिकाणी हॉटेल बांधकाम सुरु आहे. नमुद बिनशेती जमिनीचा आरोग्य विभागाकडील नाहरकत दाखला मिळणेकरीता तयार केलेला अर्ज स्विकारण्यासाठी व त्याबाबतचे कामकाज पुर्ण करुन नाहरकत दाखला देण्याकरीता आरोपी लोकसेवक शैलेश रेवाळे यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी दिनांक २५/१०/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी येथे तक्रार दिली होती.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६/१०/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक शैलेश रेवाळे यांनी तक्रारदार यांचेकडुन त्यांच्या मालकांचे हॉटेल बांधकामाकरीता आवश्यक असणारा आरोग्य विभागाकडील नाहरकत दाखला मिळणेकरीता तयार केलेला अर्ज स्विकारुन व त्याबाबतचे कामकाज पुर्ण करुन नाहरकत दाखला देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १५,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन मागणी केलेली लाच रक्कम स्विकारणार असल्याचे मान्य केल्याचे पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झालेले आहेत.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार नमुद बिनशेती जमिनीचा आरोग्य विभागाकडील नाहरकत दाखला मिळणेकरीता तयार केलेला अर्ज स्विकारुन व त्याबाबतचे कामकाज पुर्ण करुन नाहरकत दाखला देण्याकरीता श्री. शैलेश आत्माराम रेवाळे, वय. ३८ वर्षे, आरोग्य सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केन्द्र कोतवडे ता. जि. रत्नागिरी यांनी तक्रारदार यांचेकडुन १५,०००/-रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यानंतर दिनांक ३१/१०/२०२३ रोजी १४.४६ वाजता के सी जैन नगर रत्नागिरी येथील हॉटेल फ्लेवर्सच्या बाहेरील रस्त्यावर पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी- १. मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, परिक्षेत्र ठाणे.**

**२.मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, परिक्षेत्र ठाणे.**

**३.मा. श्री. सुधाकर सुराडकर, अपर पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, परिक्षेत्र ठाणे.**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र विभाग यांचेशी संपर्क करावा.**

---

संपर्क पत्ता - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी.

संकेतस्थळ - **acbmaharashtra@mahapolice.gov.in**

**Email - spacbthane@mahapolice.gov.in**

ॲप्लीकेशन- **acbmaharashtra.net**

टोल फ्रि नंबर- १०६४/ दुरध्वनी क्रमांक- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉट्सॲप क्रमांक - ९९३०९९७७००

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau
सत्यमेव जयते
RATNAGIRI

**(शहानवाज मुल्ला)**
**पोलीस निरीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी.**